BMF NEWS NETWORK
Bmfnewsnetwork.org
Date- Saturday 25 july 2026. सह संपादक- धर्मदेव ठाकूर bmf news

एस.एस.व्ही.पी.एस.महाविद्या धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर जनजागृती.

प्रतिनिधी:- सतिष पवार

धाडरे (धुळे) :- क्विक हील फाउंडेशन आणि एसएसव्हीपीएस सायन्स महाविद्यालय, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने 'सायबर शिक्षणातून सायबर सुरक्षा' या सायबर सुरक्षा क्लबतर्फे एनसीसी शिबिरात 'माझा डेटा, माझी जबाबदारी' या विषयावर भव्य सायबर जनजागृती अभियान आयोजित करण्यात आले. या कार्यक्रमाला 500 ते 600 हून अधिक एनसीसी कॅडेट्स, एनसीसी अधिकारी, प्राध्यापक व मान्यवर उपस्थित होते.कार्यक्रमाच्या प्रारंभी सायबर सुरक्षा क्लबच्या समन्वयक प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांनीप्रास्ताविकातून क्विक हील फाउंडेशन, 'सायबर शिक्षणातून सायबर सुरक्षा' हा उपक्रम, 'कमवा व शिका' ही संकल्पना तसेच सायबर सुरक्षेचे महत्त्व उपस्थितांसमोर विषद केले. त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करुन या संपूर्ण कार्यक्रमाची प्रभावी तयारी करुन घेतली.या कार्यक्रमाला ॲड. रोहित कोहक, सौ. भावना पाटील (मानसशास्त्रज्ञ), ॲड. गायत्री भामरे (सखी वन स्टॉप सहायता केंद्र) तसेच डॉ. हर्षल भामरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. तसेच प्राचार्य प्रा. एम. व्ही. पाटील, उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे आणि कर्नल सुदीप मिश्रा यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रारंभी उपप्राचार्य प्रा. के. एम. बोरसे यांनी उपस्थितांचे स्वागत केले. तसेच हा कार्यक्रम यशस्वीरीत्या पार पाडण्यासाठी त्यांनी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमात 'सायबर शिक्षणातून सायबर सुरक्षा' सायबर सुरक्षा क्लबच्या विद्यार्थ्यांनी 'माझा डेटा, माझी जबाबदारी' या विषयावर प्रभावी नुक्कड नाटक सादर केले. या नाटकाद्वारे ओटीपी फसवणूक, डिजिटल अटक, लैंगिक ब्लॅकमेलद्वारे खंडणी, क्यूआर कोड फसवणूक, बनावट समाजमाध्यम ओळख (फेक सोशल मीडिया आयडी) तसेच इतर सायबर फसवणुकींबाबत प्रभावी जनजागृती करण्यात आली. त्यानंतर आयोजित सायबर प्रश्नमंजुषेत एनसीसी कॅडेट्सनी उत्स्फूर्त सहभाग घेत अचूक उत्तरे देत कार्यक्रमात रंगत आणली.यावेळी प्राचार्य प्रा. एम. व्ही. पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत सायबर सुरक्षेची माहिती स्वतःपुरती मर्यादित न ठेवता ती आपल्या कुटुंबीय, मित्रपरिवार आणि समाजापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले.कार्यक्रमाच्या शेवटी कर्नल सुदीप मिश्रा यांनी आभार प्रदर्शन केले. त्यांनी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नुक्कड नाटकाचे, विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासाचे, प्रा. डॉ. स्वाती बोरसे यांनी घेतलेल्या परिश्रमाचे तसेच क्विक हील फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर आणि क्विक हील कंपनीचे संस्थापक कैलास काटकर व संजय काटकर यांनी सुरु केलेल्या सायबर जनजागृतीच्या उत्कृष्ट कार्याचे विशेष कौतुक केले.या सायबर जनजागृती अभियानात नंदिनी सोनवणे, प्राची पाटील, मानसी महाजन, कक्षा देसले, अर्जुन पाटील, वेदांत पाटील, अजय सावळे, गर्वित पाटील, हिमांशू बागुल आणि मिताली पारधी यांनी नुक्कड नाटक सादर केले. तसेच कार्यक्रम यशस्वी आणि प्रभावीपणे पार पाडण्यासाठी सायबर सुरक्षा क्लबच्या अध्यक्षा पूजा देवरे, सचिव ओम सोनार, उपक्रम संचालक नंदिनी सोनवणे आणि प्रसारमाध्यम संचालक हिमांशू रघुवंशी तसेच सायबर योद्धे मयूर सुमित वाघ, जयेश पवार, प्रेम शिंदे, कार्तिक चव्हाण, दुर्गेश साळुंखे, मयूर अहिरे आणि भटू पाटील यांनी विशेष परिश्रम घेतले. तसेच प्रा. रुपाली पाटील, प्रा. वर्षा पाटील, प्रा. सविता पाटील, प्रा. अश्विनी पाटील आणि प्रा. सायली नंदन यांचेही मोलाचे सहकार्य लाभले.या यशस्वी उपक्रमाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. बाबासाहेब कुणाल पाटील तसेच उपाध्यक्ष मा. बापूसाहेब एस. टी. पाटील यांनी सायबर सुरक्षा क्लबच्या विद्यार्थ्यांचे, समन्वयक प्रा. डॉ. स्वाती बोरसे आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन करुन त्यांच्या कार्याचे कौतुक केले.